**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक ०६ ऑगस्ट २०२४**

## ठळक बातम्या

1. **देशात गेल्या १० वर्षांत नक्षलवादी घटनांचं प्रमाण ५३ टक्क्यांनी कमी झालं असल्याचं गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांचं आज लोकसभेत प्रतिपादन.**
2. **बांगलादेशात उद्‌भवलेल्या जटिल परिस्थितीत भारतीय सीमा सुरक्षा दलांना सजग राहण्याचे परराष्ट्र मंत्र्यांचे निर्देश.**
3. **10 वा राष्ट्रीय हातमाग दिन उद्या विज्ञान भवन, नवी दिल्ली इथं होणार साजरा, नागपुरात विविध ठिकाणी भरणार खादी महोत्सव प्रदर्शन.**

**आणि**

4. **दत्ताजी डिडोळकर जन्मशताब्दी समारोहाचा उद्या सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या उपस्थितीत समारोप.**

****

लोकसभा/नक्षलवाद

देशात गेल्या १० वर्षात नक्षलवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात ओसरल्याचं गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. २००४ ते १४ या कालावधीच्या तुलनेत २०१४ ते २४ या काळात नक्षलवादी घटनांचं प्रमाण ५३ टक्क्यांनी कमी झालं आहे, असं ते म्हणाले. देशात नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या जिल्ह्यांची संख्या कमी होऊन ३८ वर पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या १० वर्षात नक्षलवादी घटनांमध्ये मृत पावलेले सुरक्षा दलाचे जवान तसंच नागरिकाचं प्रमाण देखील कमी झालं आहे, असं ते म्हणाले.

बांगलादेश/सर्वपक्षीय बैठक/एस.जयशंकर

१९७१साली बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याच्या निर्णयाविरोधात शेजारील बांगला देशात मागील एक महिन्यापासून सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काल पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा देऊन देश सोडला. त्यानंतर बांगलादेशची संसद बरखास्त करून हंगामी सरकार स्थापन करणार असल्याचं बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी ढाका इथं सांगितलं. बांगलादेशमधली सध्याची अराजकता दूर करण्यासाठी लष्कराची मदत घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज नवी दिल्ली इथं

सर्वपक्षीय बैठक आयोजित केली होती. परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी आज या मुद्द्यावर सर्व नेत्यांना माहिती दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री तसंच भाजपा अध्यक्ष जे.पी.नड्डा, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसचे नेते सुदीप बंदोपाध्याय, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे, यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते. बांगला देशात सध्या १९ हजार भारतीय असून त्यापैकी नऊ हजार विद्यार्थी आहेत. भारत दूतावासाच्या माध्यमातून त्यांच्या संपर्कात असल्याचं परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी आज दुपारी राज्यसभेत सांगितलं. बांगलादेशात उद्भवलेल्या या जटिल परिस्थितीत भारतीय सीमा सुरक्षा दलांना अत्यंत सजग राहण्याचे निर्देश देण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. दरम्यान शेख हसीना काल रात्री नवी दिल्ली इथं पोहचल्याची माहिती एस जयशंकर यांनी राज्यसभेत दिली. बांगलादेशचे लष्कर प्रमुख जनरल वकार-उझ-जमान लवकरच विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रतिनिधींची भेट घेणार आहेत.

राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या फिजीच्या दौऱ्यावर असून त्यांना आज ‘द कंपॅनियन ऑर्डर ऑफ फिजी’ हा फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. फिजीचे राष्ट्राध्यक्ष विलयम काटोनिवेरे यांनी त्यांना या पुरस्कारानं सन्मानित केलं. फिजीच्या लष्कराकडून मुर्मू यांना ‘गार्ड ऑफ ऑनर’ सुद्धा देण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारत-फीजी संबध दृढ करण्यासंदर्भात फिजीचे राष्ट्राध्यक्ष आणि प्रधानमंत्र्यांबरोबर चर्चा केली. फिजीची राजधानी सुवा इथं आज सकाळी त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं.

संसद/खा.बळवंत वानखडे

केंद्र सरकारने GST आणून लघू, मध्यम उद्योग धंद्यांचं आणि व्यापाऱ्यांचं मोठं नुकसान केलं असून, जीवनावश्यक वस्तूंवर सुद्धा जीएसटी लावल्याने मोठ्या प्रमाणात महागाईत वाढ झाली असून जनसामान्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भात विरोधी पक्ष सरकारवर सातत्याने टीका करत आहे. आरोग्य विमा व जीवन विम्यावरील GST मागे घेण्याच्या मागणीसाठी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी INDIA आघाडीच्या खासदारां समावेत आज संसदेतच्या मकर द्वारा समोर निदर्शने केली.

दुसरा विशेष पुनरिक्षण

१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. ६ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादीचे प्रकाशन, २० ऑगस्ट पर्यंत दावे आणि हरकती स्वीकारणे, दि. १० आणि ११ ऑगस्ट तसेच १७ आणि १८ ऑगस्ट या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं असून, या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर केंद्रस्तरीय मतदान अधिकारी उपस्थिती राहणार आहेत. यावेळी फॉर्म नं. ६, ७ आणि ८ स्वीकारण्यात येणार आहे. ३० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादीचे प्रकाशन होईल. दरम्यान, आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी नागपूर विभागात मतदारांची संख्या वाढावी आणि मतदानाची टक्केवारी 75 टक्क्या पेक्षाही अधिक रहावी यासाठी नागपूरची जिल्हा निवडणुक यंत्रणा प्रयत्नशील असल्याचं जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

नागपूर स्फोट

नागपूरच्या मौदा तहसील मधील हलक्या वजनाच्या विटा बनवणाऱ्या श्रीजी ब्लॉक नामक कंपनीत आज पहाटेच्या सुमारास स्फोट झाल्यानं एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून नऊ कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ऑटो क्लिप मधील स्टीम लीक झाल्यामुळे हा स्फोट झाला असावा असा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच कंपनीचे अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले. कंपनीकडून मृतक व्यक्तीला 30 लाखांचं आर्थिक सहाय्य देण्याचं आश्वासन देण्यात आलं आहे. कंपनीचा औद्योगिक सुरक्षा विभाग या स्फोटाबद्दल तपासणी करणार आहे.

केंद्र/खादी महोत्सव प्रदर्शन/विणकर सेवा केंद्र

10 वा राष्ट्रीय हातमाग दिवस उद्या विज्ञान भवन, नवी दिल्ली इथं उपराष्ट्रपतींच्या प्रमुख उपस्थितीत साजरा केला जाणार आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री, गिरिराज सिंह आणि परराष्ट्र व्यवहार आणि वस्त्रोद्योग राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. डिझायनर, उद्योग प्रतिनिधी आणि निर्यातदार, तसेच देशभरातील 1000 हून अधिक विणकर या समारंभाला उपस्थित राहणार आहेत.यावेळी हातमाग क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबाबत हातमाग विणकरांना संत कबीर पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. बुनकर सेवा केंद्र, नागपूर द्वारे दरवर्षीप्रमाणे यंदाही उद्या सिविल लाईन्स,येथील कार्यालय परिसरात दहावा राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करण्यात येणार आहे. सुक्ष्म,लघु व

मध्यम उद्योग मंत्रालयाच्या आयोगाचे केन्द्रीय सदस्य जयप्रकाश गुप्ता यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या सकाळी ११ वाजता दिप प्रज्वलन करण्यात येईल. वस्त्र मंत्र्यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत आयोजित मुख्य समारंभाचे प्रसारण देखील या कार्यक्रम दरम्यान केले जाणार आहे. हातमागावर आधिरीत वस्तूंचं प्रदर्शन यावेळी भरविण्यात येणार आहे. नागपुरात जिल्हाधिकारी कार्यालय परिसर इथं कार्यालयीन वेळेत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत 9 ऑगस्टपर्यंत खादी महोत्सव प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ ग्रामीण भागातील उद्योजकासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबवित आहे. या माध्यमातुन ग्रामीण भागात उद्योग उभारणी केलेल्या खादी व ग्रामोद्योगी वस्तुना शहरी भागात बाजारपेठ आणि ओळख मिळवुन देण्याचे कार्य मंडळामार्फत केले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमात केलेल्या आवाहनानुसार खादी वस्त्राना बाजारपेठ मिळवुन देण्यासाठी आणि खादीचा प्रचार, प्रसार तसच वापर वाढावा यासाठी मंडळ विविध उपक्रम राबवित आहे. या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केलं आहे.

दत्ताजी डिडोळकर जन्मशताब्दी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापना काळातील अग्रणी कार्यकर्ते, जुन्या मद्रास प्रांतातील संघप्रचारक, कन्याकुमारी स्थित विवेकानंद शिला स्मारकाचे प्रेरणास्रोत दत्ताजी डिडोळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. जन्मशताब्दी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम उद्या दिनांक 7 ऑगस्ट रोजी रेशीमबाग येथील कवी सुरेश भट सभागृहात सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ.मोहन भागवत, अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे स्वामी जितेंद्रनाथ महाराज, अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजशरण शाही यांची उपस्थिती राहील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन्मशताब्दी समारोह समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दत्ताजी डिडोळकर यांच्या जीवनावर आधारित ‘आधारवड’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणा-या संस्थेला “श्रद्धेय दत्ताजी डिडोळकर शिक्षण पुरस्कार” प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे सचिव अजय संचेती यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

अंतराळ दिन

येत्या 23 ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं 'राष्ट्रीय अंतराळ दिन' साजरा केला जाणार आहे. भारताचा अंतराळातील प्रवास अधोरेखित करणारी मध्यवर्ती संकल्पना 'टचिंग लाईव्हज् व्हाईल टचिंग द मून' अर्थात 'चंद्राला स्पर्श करताना जीवनाला स्पर्श करणे' ही यंदाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारताच्या अंतराळातील कामगिरीबाबत जागृती करतानाच देशाच्या तरुणांना प्रेरित करणं आणि अंतराळ संशोधनाचा उपयोग समाज आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी करणं यावर प्रामुख्याने भर दिला जाणार असून महिनाभर  हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस इथं सुरू असलेल्या ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अविनाश साबळे यांनी काल ऐतिहासिक कामगिरी करत पुरुषांच्या 3 हजार मीटर स्टीपलचेस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. महाराष्ट्राच्या बीडच्या अविनाश यांनी या शर्यतीत पाचवं स्थान मिळवत अंतीम फेरी गाठली. येत्या ८ऑगस्टला अंतिम फेरी होणार आहे. हॉकीमध्ये आज उपांत्य फेरीतील सामना जर्मनीशी होणार आहे. अंतिम सामन्यात स्थान पक्कं करण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. भारतीय प्रमाण वेळेनुसार हा सामना रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सुरू होणार आहे.भालाफेक स्पर्धेतल्या ब गटाच्या पात्रता फेरीत आज भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा याने ८९ पूर्णांक ३४ मीटर दूर भाला फेकत क्रमवारीत  प्रथम क्रमांकासह अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तर के जेना नवव्या स्थानावर राहिला. दोनवेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेली भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाट हिने ५० किलो वजनी गटात युक्रेनच्या ओकसाना लिवाच हिला ७-५ ने हरवून  उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत आज रात्री सव्वा दहा वाजता तिचा सामना क्युबाच्या युस्नेलीस गझमन सोबत होणार आहे.

******